# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १६७/२००८/ दिनांक :

१) श्री. महादेव ज्ञानू काळे,
मु.पो. सिंगन्नहळ्ळी, ता. जत, — अर्जदार
जिल्हा सांगली.

२) श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे, — तक्रारदार प्रतिनिधी
मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२) कार्यकारी अभियंता(शहर),
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. — विरूध्द पक्षकार
ग्रामीण विभाग, सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उपविभागीय कार्यालय, जत,

जि. सांगली

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**कोरम** :- १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार



श्री. महादेव ज्ञानू काळे यांनी सिंगन्नहळ्ळी, ता. जत येथे दिनांक २६-४-२००५ रोजी ३ अश्वशक्ती शेतीपंप कनेक्शनला जोडणी मागितली होती. वितरण कंपनीकडून मंजुरी व चलन मिळाले नाही. त्यामुळे अर्जदाराने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षमध्ये ' क्ष ' फॉर्ममध्ये दिनांक ३.३.२००८ ला तक्रार दाखल केली. त्यानंतर तक्रारदारास प्रकरणास मंजुरी व वीज कनेक्शन करीता चलन दिले. अंतर्गत ग्राहक तक्रार कक्षाने क्र. ०३३५५ दिनांक २-५-२००८ ने निर्णय दिला आहे. सदर निर्णय मान्य न झालेमुळे ग्राहकाने प्रतिनिधीमार्फत ' अ ' फॉर्ममध्ये ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळ यांजकडे दि. १७-५-२००८ रोजी अपील दाखल केले. त्यानुसार मंचाने कार्यवाही चालू केली व मुद्देनिहाय माहिती मागवून घेतली व दिनांक १८-६-२००८ रोजी दुपारी १२.३० वाजता सांगली मंडल कार्यालयात सुनावणी तारीख निश्चित केली.

सुनावणीवेळी ग्राहक प्रतिनिधी श्री. ह.दि. खापरे, तर वि.प.चे वतीने कार्यकारी अभियंता श्री. बी. बी. भोसले, कवठे महंकाळ विभाग, श्री. जी.बी. उत्पात, सहाय्यक अभियंता, जत, श्री. आर.एस. कुलकर्णी, सहाय्यक अभियंता, सांगली ग्रामीण विभाग, श्री. एस.के. पाटील, कनिष्ठ अभियंता, सांगली ग्रामीण विभाग, श्री. जे.एस. बोडके, उप कार्यकारी अभियंता, कवठे महंकाळ विभाग, श्री. एस.जी. कांबळे, शाखा अभियंता, शेगाव इ. उपस्थित होते. कार्यालयीन कामामुळे श्री. जेधे यांना उपस्थित राहता येत नसलेचे दिनांक १७-६-२००८ला कळविले आगाऊ होते.

**<u>या बाबत अर्जदाराचे तक्रारीचे स्वरूप व म्हणणे खालील प्रमाणे मांडले.</u>**

अर्जदाराने सिंगन्नहळ्ळी, ता. जत येथे दिनांक २६.४.२००५ रोजी ३ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळणसे अर्ज दाखल केला असून त्याची पोहोच घेतली आहे. अद्याप सदर अर्जास मंजुरी मिळाली नाही. सदर कामा करीता लघुदाबाची १ खांबासाठी वाहिनीची आवश्यकता आहे. रोहित्र क्षमतेमध्ये बदल नव्हता. अर्जदारास ३ वर्षे वीज पुरवठा मंजूर झाला नव्हता दरम्यान अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगलीकडे दिनांक ३.३.२००८ रोजी क्ष फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली. त्यानंतर मंजुरीची कार्यवाही होऊन दि. ११.३.२००८ ला चलन दिले. चलन रक्कम भरली, कागदपत्रांची पूर्तता केली. दरम्यान कक्षाचे निकालपत्र प्राप्त होणेपूर्वी वाहिनीचे काम पूर्ण होऊन वीज जोडणी देण्यात आलेचे अर्जदाराने सांगितले.

**<u>या बाबत वितरण कंपनीचे म्हणणे खालील प्रमाणे</u>**

तक्रारदाराने दि. २६.४.२००५ ला ३ अश्वशक्ती शेतीपंपा करीता नवीन वीज जोडणीसाठी अर्ज दाखल केला. प्रथमत: प्रकरण डिटेल प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये प्रत्यक्षात १ खांब लघुदाब वाहिनीत वाढ करणेचे काम होते. परंतु २ खांब वाहिनीचे काम प्रस्तावित करणेत आले दि १.५.२००५ अर्ज सर्व्हे करीता शाखा कार्यालयास पाठविला. त्यांचेकडून ता. २२.९.२००५ ला प्राप्त झालेवर दिनांक २९.९.२००५ ला विभागीय कार्यालयास प्रस्तावित करणेत आला. तथापि डिटेल प्रोजेक्ट रिपोर्टला मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे एस.पी.ए. स्किममध्ये विभाग कार्यालयाकडून मंजुरी दिली. अर्जदारास दिनांक १२.३.२००८ रक्कम भरणेस चलन दिले. चलन दिनांक २४.३.२००८ ला भरले. अर्जदाराने चाचणी अहवाल दिनांक १६.६.२००८ ला दिला. त्यानुसार अर्जदारास वीज जोडणी दिनांक १७.६.२००८ ला दिली आहे.



**<u>सदस्य सचिव व अध्यक्ष यांचे मत</u>**

अर्जदाराने दिनांक २६.४.२००५ रोजी नवीन जोडणी करीता अर्ज दाखल केलेवर उप विभागाकडून सर्व्हे करण्यासाठी तो शाखा कार्यालयाकडे पाठविला. तेथे तो दिनांक १.५.२००५ ते २२.९.२००५ पर्यंत प्रलंबित राहिलेचे दिसते. तेथून प्राप्त झालेवर दिनांक २९.९.२००५ ला तो विभागीय कार्यालयाकडे प्रस्तावित झाला. नंतर डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट योजनेत काअ/साप्रवि/ग्रा/डिपीआर/९५–९८/९४८७/०६–०७ ने समाविष्ट केले. परंतु सदर येजनेस मंजुरी कार्यान्वित झाली नाही. त्यात कालावधी वाया गेला.

त्यानंतर पर्याय म्हणून एस.पी.ए. योजनेस मंजुरी दिली व ग्राहकास त्यानंतर चलन दिले. त्याने ते भरले. शेतीपंप बसविलेचा चाचणी अहवाल देणे व वितरण कंपनीने दिनांक १७.६.२००८ रोजी वीज जोडणी दिली असे सोपस्कार पार पडलेचे दिसते.

तक्रारीवरील मुद्देनिहाय स्पष्टीकरण मंचाचे पत्र क्र. ११७/२६.५.२००८ ने मागविले होते. तथापि कार्यकारी अभियंता, सांगली ग्रामीण यांजकडून ६०५७ दिनांक ६.६.२००८ चे त्रोटक अहवाल मिळाला. त्या व्यतिरिक्त वितरण कंपनी बाजूची आधारभूत कागदपत्रे, पुरावे, बचाव इ. मिळाली नाही. मंचाने पुन्हा पत्र क्र. १६० दिनंक १०.७.२००८ दिलेवर घडमोडीच्या तारखा मिळाल्या. मुद्देनिहाय अहवाल मिळाला नसलेने अर्जदाराचा अर्ज वि.प.कडून प्रलंबित राहिलेची कारणे स्पष्ट झाले नाहीत. ग्राहकाचे अर्जात **ग्राहकास चलन मिळालेची तारीख** १३.३.२००८, सांगली कक्षाचे निकाल पत्रात ८.३.२००८ व कार्यकारी अभियंता, कवठे महंकाळ यांचे पत्र ( क्र. ५० दिनांक १८.७.२००८ ) मध्ये १२.३.२००८ नमूद केले आहे. तसेच सुनावणीमध्ये ग्राहक प्रतिनिधीनी चलन ११.३.२००८ ला मिळालेचे सांगितले. येणे प्रमाणे सदस्य सचिव यांचे मत येथे संपले.

***

**<u>ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, या मंचाचा सदस्य म्हणून मी माझे मत खालील प्रमाणे नोंदवित आहे व त्याचा सर्वार्थाने विचार होणे गरजेचे आहे.</u>**

श्री. महादेव ज्ञानू काळे या ग्राहकाने मु.पो. सिंगन्नहळ्ळी, ता. जत येथे शेतीपंपासाठी ३ एच.पी. या जोडणीसाठी दिनांक २६.४.२००५ ला अर्ज दिलेला दिसून येतो. प्रत्यक्षात बऱ्याच घडामोडीनंतर दिनांक १२.३.२००८ ला ग्राहकास चलन दिले आहे.

हे करत असतांना सप्लाय कोडमधील तरतुदीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. ग्राहकाने अर्ज केल्यावर ग्रामीण भागात १० दिवसांत जागेची पाहणी व त्यानंतर अर्जाच्या दिलेल्या तारखेपासून ३० दिवसांचे आंत खर्चाचा तपशिल कळविणे आवश्यक आहे. तसे केले नाही.

२० जानेवारी २००५ ला सप्लाय कोड अस्तित्वात येवून अद्यापही त्याच्या अंमलबजावणीकडे डोळेझाक वा दुर्लक्ष केल्यासारखे होत आहे. त्यामुळे सप्लाय कोड मधील तरतुदीप्रमाणे शास्ती लावणे व सदर शास्ती वसुलीची रक्कम ग्राहकास देणे योग्य आहे. रू. १४६००/– इतकी शास्ती प्रथमत: कंपनीने द्यावी व तदनंतर तत्कालीन संबंधिताकडून वसूल करावी असे ग्राहक सदस्य म्हणून माझे मत आहे.

***



कार्यकारी अभियंता, कवठे महंकाळ यांचेकडून अंदाजपत्रक मंजुरीची मागविलेली माहिती पत्र क्र.५० दिनांक १८.७.२००८ ला प्राप्त झालेमुळे निकालपत्र देणेस उशिर होत आहे.

दोन्ही बाजूंचे जबाब, उपलब्ध कागदपत्रे इ.चे आधारे सदस्य सचिव व त्यांना असणारे अध्यक्ष यांचे मत यानुसार बहुमताने खालील अदेश देणेत येत आहे.

## आदेश

१) अर्ज दाखल झाल्यापासून दि. २६.४.२००५ जोडणीस झालेल्या विलंब बाबत दि.२६.४.२००५ पासून ११.३.२००८ पर्यत प्रति आठवड्यास रू. १००/– प्रमाणे १४६ आठवड्यांचे रू. १४६००/– ग्राहकास नुकसान भरपाई म्हणून कंपनीने अदा करावेत.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी करणेत यावी व ती केलेची महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ कलम ८–७) च्या तरतुदीनुसार मंचास कळविण्यात यावे.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपिल करावयाचे असल्यास आदेशाच्या तारखेनंतर ६०दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल, बांद्रा– कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ५१ यांजकडे करता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

(एस.आर.बांबळे)
अध्यक्ष व सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर